रजि.नं. - ७६३९ | विना सहकार नही उद्धार | (93) | रजि. ता. १४/१२/१९३६

# भोयरे गांगर्डा विविध कार्यकारी सेवा सह. सोसा. लि;

भोयरे गांगर्डा, ता. पारनेर, जि. अहमदनगर

जा. क्र.: 	दि.: ०८/१०/२०२३

माननीय,
लोकनेते आमदार निलेशजी लंके साहेब,
विधानसभा सदस्य, पारनेर - नगर मतदारसंघ.

महोदय,

आमचे गावची व सामान्य शेतकऱ्यांची शेतीपूरक आर्थिक अडी-अडचणी सोडवणारी भोयरेगांगर्डा विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. ही संस्था गावामध्ये कार्यरत असुन या संस्थेला गावामध्ये स्वत:च्या मालकीची इमारत नाही. तसेच स्थानिक ठिकाणी संस्थेच्या ऑफिससाठी योग्य अशी इमारत नसल्यामुळे संस्थेने स्वखर्चाने सुपा या ठिकाणी भाडेतत्त्वावर ऑफिस घेतलेले आहे. त्यामुळे गावातील वृध्द व गरीब शेतकऱ्यांना संस्थेत कामानिमित्त जाणे-येणे करणे खर्चिक व अडचणीचे होत आहे.

तसेच सद्यस्थिती संस्थेची आर्थिक परिस्थिती खालवलेली असल्याकारणामुळे संस्थेच्या मालकीची जागा उपलब्ध असुनही इमारतीचे बांधकाम करणे शक्य होत नाही.

तरी आमचे भोयरेगांगर्डा विविध कार्यकारी सेवा सोसायटीला आपले विकास निधी अंतर्गत इमारत बांधकाम करुन मिळावे. तसेच गावच्या विकासासाठी आपला हातभार लावावा ही नम्र विनंती.

कळावे.

मळिला देपदाव

आपले विश्वासू,

सचिव | चेअरमन

भोयरे गांगर्डा विविध कार्य.सेवा सह.सोसा.लि.
भोयरे गांगर्डा, ता. पारनेर, जि. अ.नगर

चेअरमन / व्हा. चेअरमन.
सर्व संचालक मंडळ